## - प्रसिध्दी पत्र -

केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५० मध्ये नोंदणीकृत वाहनांवर प्रदर्शित करावयाच्या विशिष्ट नमुन्यातील सिक्युरिटी नंबर प्लेट (रजिस्ट्रेशन नंबरप्लेट) दर्शविण्याच्या तरतुदी आहेत. या नियमांनुसार राज्य शासनाने नियुक्ती केलेल्या सेवापुरवठादाराचे माध्यमातून, केंद्रीय मोटार वाहन नियम ५० ची संपूर्ण पूर्तता करणाऱ्या नंबरप्लेट, परिवहन अधिकाऱ्यांचे उपस्थितीत व परिवहन कार्यालयाचे आवारातच वाहनांवर बसविणे अभिप्रेत आहे. महाराष्ट्र राज्यात हाय सिक्युरिटी नंबरप्लेट करिता कोणाचीही अद्याप नेमणूक केलेली नाही. तरीही असे दिसून आले आहे की, राज्यात काही संस्था / व्यक्ती, सिक्युरिटी नंबर प्लेट सारख्या दिसणाऱ्या नंबरप्लेटची वाहन मालकांना विक्री करुन त्यांची दिशाभूल करीत आहेत. अशा नंबरप्लेटवर होलोग्राम, IND अशी निळया रंगातील अक्षरे, उठावदार नोंदणी क्रमांक ( embossed number) व त्यावर INDIA अशी कोनातील तिरपी अक्षरे अशा काही सिक्युरिटी वैशिष्ठांचा वापर केला जात असल्याचे दिसून येते. अशी नंबरप्लेट पुरवणाऱ्या व्यक्ती / संस्था, **'ही नंबरप्लेट वाहनांवर बसविल्यास नियमानुसार सिक्युरिटी लायसन्स प्लेट योजना अंमलबजावणीचे वेळी नंबरप्लेट बदलावी लागणार नाही'** असा दिशाभूल करणारा व चुकीचा प्रचारही करीत असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

केंद्रिय मोटार वाहन नियमानुसार विहीत आकाराच्या हाय सिक्युरिटी नंबरप्लेटवर होलोग्राम, IND ही अक्षरे, INDIA हे शब्द तिरप्या कोनात लिहिलेला काळा उठावदार नोंदणीक्रमांक, लेझरव्दारे नोंदविलेला विशिष्ट क्रमांक, उघडता न येणारे स्नॅप लॉक तसेच तीनचाकी व चारचाकी वाहनांकरिता वाहनाचे समोरील काचेवर लावावयाची स्टिकर स्वरुपातील ३ री नंबरप्लेट, यांचा समावेश होतो. नियमानुसार अशी नंबरप्लेट शासनाने नेमलेल्या सेवापुरवठादाराने परिवहन अधिकाऱ्यासमोर त्याच आवारातच बसविणे अभिप्रेत आहे.

याव्दारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, हाय सिक्युरिटी नंबरप्लेट सदृष्य अशा बनावट नंबरप्लेटची (जसे होलोग्राम, IND अक्षरे इ. चा अंतर्भाव असणारी) विक्री करणे व ती वाहनावर प्रदर्शित करणे हा भादवि ४२०, ३४ व फौजदारी प्रक्रीया संहिता कलम १५४,१५७ नुसार, गुन्हा असून त्याबाबत संबंधितांवर कायदेशीर कारवाई होऊ शकते. सबब वाहनमालकांना सूचित करण्यात येते की त्यांनी त्याचे वाहनावर बसविण्यासाठी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट सदृश नंबरप्लेट खरेदी करू नये अथवा त्या अनधिकृतपणे प्रदर्शित करु नयेत. महाराष्ट्रात हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एच.एस.आर.पी.) बसविण्यासाठी सेवापुरवठादाराची नियुक्ती केल्यानंतर याविषयी सर्व प्रसिध्दी माध्यमातून जाहीर केले जाईल. अशा नियुक्त सेवापुरवठादारामार्फत परिवहन अधिका-यांच्या उपस्थितीत बसविलेल्या व वाहनांचे समोरच्या काचेवर सेल्फ डिस्ट्रकटीव्ह स्टिकरचे स्वरुपातील तिस-या नंबर प्लेटसह बसविलेल्या हाय सिक्युरिटी नंबरप्लेटच मोटारवाहन कायद्याच्या तरतुदींनुसार वैध असतील.

परिवहन आयुक्त

महाराष्ट्र राज्य, मुंबई